पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय,प्रशासन विभाग
क्र.इक्षेका/प्रशा१/कावि/ १८७/२०१६
दि. २८/३/२०१६

विषय - कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये कार्यालयामध्ये थम्ब इम्प्रेशन इन व आउट नोंदी करुन उपस्थित राहणेबाबत....

संदर्भ - क्र प्रशासन/तप/कावि/३०२/१० दि. २८/१०/१०

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत स्थापत्य / विदयुत / पाणीपुरवठा / आरोग्य / अतिक्रमण पथक व प्रशासन विभाग कार्यरत आहेत. यापैकी प्रत्येक विभागातील प्रत्येक कर्मचा-याची कामकाजाची वेळ त्याच्या पदानुसार तसेच त्यांच्या कामकाजाच्या स्वरुपानुसार, निश्चित करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांनी बायोमेट्रीक प्रणालीनुसार थंम्ब इन व आउट करणे संदभिय परिपत्रकानुसार बंधनकारक आहे. कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर जाताना नियंत्रित वरिष्ठ अधिका-यांची परवानगी घेउन व कार्यालयातील फिरती रजिस्टरला नोंद करुन जाणे सर्वांना बंधनकारक आहे. तसेच रजेवर जाताना नियंत्रित वरिष्ठ अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व विभागातील काही अधिकारी/कर्मचारी विनापरवाना गैरहजर राहत आहेत. त्यामुळे प्रशासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण होउन नागरिकांची कामे वेळेत पार पाडणे शक्य होत नाही व तक्रारी वाढतात. सदरची बाब ही कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी आहे.

सबब प्रस्तुत परिपत्रकान्वये सर्व संबंधित अधिकारी/कर्मचा-यांना सक्त सूचित करणेत येते की, सर्व गणवेशधारक कर्मचा-यांनी गणवेश परिधान करणे , ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. तसेच सर्व कर्मचा-यांना बायोमेट्रीक प्रणालीनुसार थंम्ब इम्प्रेशन करणे बंधनकारक असून यानुसार सर्व कर्मचाऱ्यांनी नोंदी न घेतल्यास त्यांचेवर नियमाधीन कारवाई करणेत येईल. तसेच मासिक वेतन अदायगी करताना संबधित कर्मचा-यांचे थंम्ब इम्प्रेशन प्रमाणेच तीन दिवसामध्ये होणा-या लेटमार्कसाठी १ दिवस किरकोळ रजा अथवा १ दिवस अजित रजा खर्ची टाकणेत यावी व रजा शिल्लक नसल्यास विनावेतनी याप्रमाणे शाखाप्रमुखांनी आपल्या अधिनस्त कर्मचा-यांवर नियमाधीन कारवाई करावी. व जे कर्मचारी सायंकाळी थंम्ब आउट न करता कार्यालयीन वेळ संपणेपूर्वी कार्यालय सोडून जातील त्यांची अर्धा दिवस रजा खर्ची टाकावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची कसूर केलेचे निदर्शनास आल्यास संबंधित पगार बिल लिपिक, मुख्य लिपिक यांना जबाबदार धरणेत येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (२) नुसार कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्याबददल संबंधितांवर शिस्तभंगाची कडक कारवाई करणेत येईल याची सर्व संबंधितांनी स्पष्टपणे नोंद घेणेत यावी.

सही/-
क्षेत्रीय अधिकारी
इ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी पुणे -३९

प्रति - सर्व संबंधित शाखाप्रमुख

२/- आपले विभागातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना परिपत्रक बजावून त्यानुसार कार्यवाही करणेत यावी तसेच परिपत्रक बजाविलेची पोहोच इकडील कार्यालयाकडे त्वरीत सादर करावी.

प्रत - मा.तपासणी अधिकारी, तपासणी पथक पिंचिंमनपा पिंपरी- १८